विकास गोसावी यांचे

इको

# गणेशयुग

वर्ष १३वे







- विक्री
- कार्यशाळा
- प्रबोधन
- निसर्ग संवर्धन

विकास गोसावी

98226 60121 / 90229 39550

www.ganeshyug.com

इको विकास गोसावी यांचे

# गणेशयुग

वर्ष १३वे



## पुढील पिढीला संस्कार देऊया,,
## पारंपारिक पद्धतीने उत्सव साजरा करूया......

श्री गणेशाय नमः!

श्रीगणेश बुद्धीचा अधिष्ठाता, विघ्नांचा नियंत्रक, म्हणून सर्व प्रकारच्या शुभकार्यात, कार्यारंभी श्रीगणेशाचे पूजन केले जाते. गणेशोत्सव हा हिंदू धर्मियांचा महत्त्वाचा सण; आपल्या अस्मितेचा, परंपरेचा, भक्तीचा, श्रद्धेचा प्रतीक आहे. गणेशोत्सव सुरू करण्यामागे लोकमान्य टिळकांचे विचार, उद्दिष्ट, तो काळ आज राहिला नाही.

सर्वांच्या मनांत श्रीगणेशाविषयी श्रद्धा असली तरी आजचे गणेशोत्सवाचे रूप मेगाइव्हेंट झाले असून वळण श्रद्धेपेक्षा दिखाऊपणाकडे झुकते. फार मोठी आर्थिक उलाढाल असलेला गणेशोत्सव पूर्वी कुटुंबात एकाच्याच घरी असायचा. सारे कुटुंब त्या घरी एकत्र येत. नकळत भावंडांत आपुलकी वाढत होती. आज घराघरांत गणपतीमुळे वातावरणच बदलले आहे. मोठ्या सोसायटीतसुद्धा तीन-चार ठिकाणी गणपती मंडप पाहतो. समाजात गल्लोगल्लीच्या मंडपात श्रीगणेशाचे दर्शन होते. मंडळाच्या चढाओढीत आपली गणेशमूर्ती आकर्षक, भव्य रेखीव वेगळ्या वैशिष्ट्यासहित असावी, यासाठी पीओपी, रासायनिक रंग, सभागृहाच्या सजावटीसाठी थर्मोकोल, प्लास्टिक, थोडक्यात विघटन न होणाऱ्या पदार्थांचा वापर वाढला. भर रस्त्यात मंडपसाठी रस्ता उकरणे. वाहतुकीस अडथळा, सर्वत्र ध्वनिक्षेपकाचे आवाज, विजेची रोषणाई, वर्गणीसाठी, दर्शनाला येणाऱ्या सामान्य भाविकांशी, मंडळाच्या काही सेवकांची भाषा/वागणूक पाहता सामाजिक एकोपा दूरच राहतो. नुसता झगमगाट नि भपका. दर्शनाला जाताना प्रसाद, हार, फुलांसाठी प्लास्टिकच्या पिशवीचाच वाढता वापर. विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी आपण पूजलेले गणपती समुद्रात इतस्ततः पडलेले पाहता मन विषण्ण होते. धुमधाम पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याने पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. गणेशोत्सव धार्मिक न राहता ग्लोबल झाला आहे. सगळ्यांचेच अतिक्रमण. कशासाठी हे सारे? गणेशोत्सव हा आपला पारंपरिक आणि सांस्कृतिक ठेवा जपायलाच हवा. यासाठी प्रत्येक टप्प्याला पर्याय आहे.



# इको गणेशयुग
विकास गोसावी यांचे

वर्ष १३वे




प्रत्येक सण निसर्गाशी निगडित असतो. निसर्गाचे पर्यायाने पर्यावरणाचे रक्षण करणे हाच सर्व सणांचा मूळ उद्देश असतो. पर्यावरणपूरक गणेशोत्सवात श्रीगणेशाची मूर्ती मातीची असावी, तिचा आकार आणि उंची दोन्ही मर्यादित असावे. चिकण मातीच्या, शाडूच्या मूर्ती बनविण्याच्या अनेक वर्कशॉप आहेत. मातीची मूर्ती घरी बनविल्याने त्या गणेशाच्या मूर्तीविषयी आत्मीयता वाटते. सजावटीसाठी नैसर्गिक रंग वापरतात. काहीजण घरातील धातूच्या मूर्तीचीच प्राणप्रतिष्ठा करतात.

महाग सजावटीचे सामान, फुले घेण्याऐवजी घरातीलच सामानाचा कलात्मक वापर किंवा विविध फॅन्सी, चमकदार रिच ब्रोकेड कापडाचा वापर किंवा जुन्या झाडांची फुले-पाने रंगवून किंवा हिरव्यागार पानाफुलांच्या कुंड्या, विविध आकारांची पाना-फुलांची सजावट निसर्गाशी, वृक्षाशी नाते सांगते. समईच्या मंद तेलवातीच्या उजेडात, धूप कापूरच्या सुवासात, शांत वातावरणात श्रीगणेशाचे दर्शन घेताना आपणही निसर्गाच्या जवळ जातो व मन प्रसन्न होते.

आपली पारंपरिक वाद्ये ढोल-ताशा, झांज, लेझीम वापरून वाजत-गाजत उत्साहाने श्रीगणेशाचे आगमन आणि विसर्जन करतो. फक्त तो आवाज दिवसभर चालू राहतो. टाळ्या वाजवत मुखाने केलेला श्रीगणेशाचा जयघोषही आपला वाटतो.

श्रीगणेशाची मूर्ती शाडूची किंवा नैसर्गिक पर्यावरपूरक साहित्यापासून बनल्यास पाणी दूषित न होता मूर्तीचे विसर्जन सहज होईल. दिव्याच्या रोषणाईसाठी अधिकृत विजेची जोडणी घ्यावी. विजेच्या बचतीसाठी ठरवीक वेळीच लायटिंग लावावे. मूर्तिकार मूर्तीत जे देवत्व आणतात, ती मूर्ती आणि कलाकारांनी उभारलेला देखावा रांगेशिवाय जवळून पाहता यावा, अशी व्यवस्था करता आली, तर करावी. ध्वनिक्षेपक नसावाच. आवाजाची मर्यादा पाळत, देवघराच्या सभामंडपात (प्रार्थनास्थळात), शांत सौम्य आवाजात उत्सवाला योग्य गाणी ऐकायला चांगली वाटतात.

आज इको फ्रेंडली गणपतीमुळे घराघरांतील चित्र बदलले आहे. मूर्तीच्या निवडीपासून विसर्जनापर्यंत लोकांनी पर्यावरणपूरक विचार स्विकारला आहे.

देवाकरिता मनुष्य नसून मनुष्याकरिता देवाचे अस्तित्व असते.' बदल हवा आहे, 'वर्गणीपासून - विसर्जनापर्यंत; मूर्तीच्या आकारापासून - कार्यक्रमाच्या सादरीकरणापर्यंत; मांडणीपासून - सजावटीपर्यंत. करू एक नवी सुरुवात - शेवटी प्रत्येकाचे विचार वेगळे, श्रद्धास्थान वेगळे. स्वच्छतेसाठी, प्रदूषण मुक्ततेसाठी, पर्यावरणाच्या सुरक्षिततेसाठी 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव' ही काळाची खरीखुरी गरज आहे; करू एक नवी सुरुवात!



इको गणेशयुग विकास गोसावी यांचे

वर्ष १३वे

# माझा बाप्पा मातीचा बाप्पा









इको विकास गोसावी यांचे

# गणेशयुग

वर्ष १३वे

## माझा बाप्पा मातीचा बाप्पा









इको विकास गोसावी यांचे

# गणेशयुग

वर्ष १३वे



श्री. सलील कुलकर्णी
श्री. संदीप खरे



चला हवा येऊ द्या टीम



गायीका
वैशाली सावंत



अभिनेता
स्वप्नील जोशी



अभिनेते भाऊ कदम



सोलापूर म.न.पा.
आयुक्त शितल तेली-उगले
आणि त्यांचे चिरंजीव
आदित्य तेली-उगले






मा. प्रणिती शिंदे
सोलापुरातील पहिली
महिला खासदार

## आम्ही भक्त बाप्पाचे

इको विकास गोसावी यांचे

# गणेशयुग

वर्ष १३वे

## तरुण भारत संवाद

# पर्यावरण पूरक गणेशोत्सवासाठी कृतीशील गणेशयुग

आपल्या संस्कृतीत सण उत्सव यांना महत्त्व आहे. गणेश या बुद्धीच्या देवास नमन करून सर्व शुभकार्याचा प्रारंभ केला जातो. महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात घरोघरी साजरा केला जातो. बालमंडळापासून ते मोठ्या गणेश मंडळ, संस्थापर्यंत सार्वजनिक गणेशोत्सवात गणेश प्रतिष्ठापना केली जाते. ही संख्या वाढत आहे. गणेशोत्सवात अनेक सजावटी, देखावे, गणेश मूर्ती यामुळे पर्यावरणाचा त्रास होत आहे. जल, वायू, माती यांचे तसेच ढोलताशा डॉल्बी याच्याही आवाजाचे प्रदूषण होत आहे. पर्यावरणास व संस्कृती घातक असणारे कृत्य कळत नकळत ठरत आहे. गणपती विसर्जनानंतर निर्माल्याचे व्यवस्थापनाचे प्रश्न वाढत आहेत. यासाठी काय करता येईल हा विचार अभ्यासक पर्यावरण प्रेमी करत असतात. उत्सव व भाविकांच्या मनातील श्रद्धा यांना आपण थांबू शकत नाही. सकारात्मक विचार व प्रबोधन यासोबत गणेशोत्सव साजरा करण्यासाठी प्रयत्न होत आहेत. पर्यावरण पूरक गणेशोत्सव यासाठी गणेश मूर्तीस पर्यावरण पूरक बनवल्या गेल्या पाहिजेत असेच विचार तरुण-तरुणींनी शिक्षकांनी केला. गणेश युगाची सुरुवात झाली. पर्यावरण पूरक गणेश चळवळ ही श्री विकास गोसावी व त्यांचे सहकारी यांनी उभी केली. शास्त्रशुद्ध पद्धतीने तब्बल ५१ स्वरूपातील पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनवल्या जाऊ लागल्या.

पर्यावरण पूरक गणेशोत्सव ही संकल्पना घेऊन मूर्ती प्रशिक्षण कार्यशाळा सुरू केले. शालेय विद्यार्थ्यांना घरच्या घरी गणेश मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण दिले जाते. बनवलेल्या मूर्ती घरीच प्रतिष्ठापणा करायची असे सांगितले जाते. अनंत चतुर्दशी दिवशी या मूर्ती घरातच विसर्जित करण्याची संकल्पना रुजवण्यात येऊ लागली. कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना, पालकांना मार्गदर्शन करण्यात येते. सोलापूरमध्ये पाण्याचे स्त्रोत फार कमी आहे. तेव्हा जल प्रदूषण होऊ नये यासाठी आपल्या शहरातील तलाव, विहिरी व इतर जल ठिकाणी विसर्जन करू नये. ते घरच्या घरी व्हावे हे महत्त्वाचे वाटते. तसेच महानगरपालिकेनेही पर्याय उपलब्ध केलेले असतात. त्याचा वापर केला जावा. मखर सजावट ही सुद्धा प्लास्टिक न वापरता पर्यावरण पूरक बनवण्याची कार्यशाळा मधून मार्गदर्शन दिले जाते. कला संगीत नृत्य महोत्सवाचे हे आयोजन करण्यात आले होते. कलेतून जीवन जगावे जीवन जगण्याची दिशा व आनंद कलेतूनच मिळतो. सर्वांच्या कलागुणांना वाव देणे, नवनिर्मिती करणे यासाठी विविध स्पर्धेचे आयोजन केले जाते. ऑनलाइन बुद्धिबळ स्पर्धा घेऊन त्याची रक्कम कोविड निधीस सुपूर्द केली. आई हे प्रत्येकाचे प्रेरणास्थान आहे हे लक्षात घेता आजच्या तंत्रज्ञान युगात पत्र हे विसरत चालले आहे. हस्ताक्षर सुलेखन स्पर्धा व जागतिक मराठी दिवस हा एक पत्र आईसाठी घेऊन साजरा केला गेला दिवाळीमधील किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन केले. लॉकडाऊन काळात पहिला डिजिटल आर्ट क्लास घेतला. शहरातील भिंतीवर कलात्मक पेंटिंग करून भिंती रंगवून सामाजिक व पर्यावरण संदेश दिले. प्लास्टिकचा वापर कमी व्हावा म्हणून पेपर पिशव्या बनवणे कार्यशाळा घेतात. कारागृहातील महिलांसाठी कागदी पिशवी बनविण्याचे प्रशिक्षण दिले. तसेच दिवाळीचा दीपोत्सव हा सुद्धा पर्यावरण पूरक आकाश कंदील बनवण्याची कार्यशाळा व प्रबोधनात्मक साजरा होतो. फॅब्रिक पेंटिंग, वारली पेंटिंग, दोरा कलाकृती फुलदाणी पेंटिंग, व फुलांच्या रांगोळ्या अशा बहुउद्देशीय उपक्रमातून कलात्मक पद्धतीने विद्यार्थ्यांना महिलांना मार्गदर्शन व प्रशिक्षण देतात. पर्यावरणासाठी खारीचा वाटा उचलतात. गणेश युग पर्व हे गेले अकरा वर्षे कार्यरत आहे. लिम्का बुक मध्ये पर्यावरण पूरक बाप्पाची नोंद करण्याचा प्रयत्न आहे. बालकांच्या बौद्धिक, तसेच सामाजिक, भावनिक विकासासाठी कटिबद्ध आहेत. या सर्व कार्यात अनेक मित्रमंडळी निसर्ग प्रेमी यांचा सहभाग असतो. आतापर्यंत पुणे, मुंबई, पंढरपूर, बार्शी अक्कलकोटसह विदेशातही अनेक वेगवेगळ्या संस्था, वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे यांच्या सहकार्याने वीस हजार पेक्षाही जास्त विद्यार्थ्यांना गणेश युग कार्यशाळेतून प्रशिक्षण देण्यात आले. पर्यावरण पूरक गणेशाची विक्री ही करण्यात येते. या संस्थेचे विकास गोसावी, रेश्मा गोसावी, आसावरी गांधी, डॉ.अनुशू शर्मा, अमोल व्यवहारे, मनोज गिरी, आदित्य गांधी सोनाली बायमोडे ,सचिन जगताप, बसवराज जमखंडी, राहुल बिराजदार यांचा समावेश आहे.

इको पर्यावरण पुरक गणेशयुग




गणेश युग, सोलापूर
९८२२६६०५२१

– विद्या भगरे–भोसले
- मो.नं. ८८८८५३७३९२

---

**सोशल मीडियावर लाईव्ह प्रात्यक्षिक :** हजारो सोलापूरकरांनी नोंदविला ऑनलाईन सहभाग

# शाडूच्या गोळ्याला आकार देत लीलया साकारली गणेश मूर्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** शाडू मध्यम अन् घट्ट स्वरूपात मळून घेतल्यानंतर विघ्नहर्त्या गणरायाची मूर्ती साकारण्यास कलाशिक्षक विकास गोसावी यांनी प्रारंभ केला...हे सारं सोशल मीडियावर लाईव्ह होतं. हजारो सोलापूरकर लाईक, शेअर अन् कमेंट करत 'लोकमत'च्या 'शाडूच्या गणेशमूर्ती घरोघरी' या उपक्रमांतर्गत आयोजित केलेले प्रात्यक्षिक पाहण्यात गर्क झाले. अतिशय सुंदर निवेदन करत गोसावी यांनी 'श्री' मूर्तीचा चेहरा, सोंड, आशीर्वादासाठी पुढे आलेले अन् आयुधं धारण केलेले हात शिवाय अन्य अवयव लीलया तयार करत गणरायाची मूर्ती साकारली.

लोकमत इनिशिएटिव्ह

शाडूचे 'गणपती' घरोघरी

होटगी रोडवरील लोकमत भवनात रविवारी सकाळी या प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते.पर्यावरणप्रेमी कलाशिक्षक विकास गोसावी यांनी शाडूच्या गणेश मूर्तीबद्दल शास्त्रशुद्ध तसेच तांत्रिक माहिती देत जवळपास वीस ते पंचवीस मिनिटे मूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण दिले. सोबत गणेश महिमा देखील त्यांनी सांगितला. यावेळी फेसबुक लाईव्हवर हजारो लोकांकडून लाईक्स आणि कमेंट्स मिळाल्या. 'शाडूच्या गणेशमूर्ती घरोघरी' समाजाभिमुख उपक्रमाद्वारे 'लोकमत'ने इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन सोलापूरकरांना केले. त्यासाठी मागील महिनाभरापासून इको फ्रेंडली मूर्तिकार, गणेश भक्तांच्या विविध उपक्रमाबद्दल माहिती प्रसिद्ध केली. याच पार्श्वभूमीवर 'लोकमत'ने इको-फ्रेंडली शाडूच्या गणेशमूर्ती बनविण्यासंदर्भात फेसबुक लाईव्हद्वारे प्रशिक्षण दिले. 'लोकमत'च्या या उपक्रमाचे स्वागत आणि कौतुक होत आहे. यंदा दहा हजारांहून अधिक घरांमध्ये शाडूच्या गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे.

अनेक संस्था संघटना तसेच मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळांनी देखील 'लोकमत'च्या उपक्रमाला पाठिंबा दिला आहे.



'लोकमत'च्या' शाडूच्या गणेशमूर्ती घरोघरी' या उपक्रमांतर्गत मूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविताना कलाशिक्षक विकास गोसावी.



शाडूच्या गणेशमूर्ती साकारण्यासाठी 'लोकमत'चे ऑनलाईन प्रात्यक्षिक पाहून आशा मराठी विद्यालयातील मुलींनी शाळेत एकत्र येऊन मूर्ती तयार केल्या.

### अशी तयार करा मूर्ती

माती तयार करण्यासाठी प्रथम ताटामध्ये किंवा प्लास्टिक पेपरवर मातीमध्ये पाणी घालून माती मध्यम-घट्ट मळून घ्यावी. जेणेकरून मातीमध्ये बारीक किंवा छोटे खडे होणार नाहीत, याची काळजी घ्यावी. गणपती माती तयार झाल्यानंतर गणपती मूर्ती सुरु करताना सर्वप्रथम पाट, चौरंग बनवून घ्यावा. त्याच्यानंतर पाय, कमरेचा भाग, पोटाचा भाग, खांदे, हात आणि मस्तक तयार करून एकेक पार्ट एकमेकांना जोडावेत. हे पार्ट जोडत असताना पाण्याचा वापर कमीत कमी असावा. जास्त पाणी लावल्यामुळे त्याला तडे जाऊ शकतात. गणपतीचा बेसिक आकार झाल्यानंतर बोटाने किंवा अंगठ्याने त्याच्यावर जे उठावदार भाग आहेत त्यांना फाईन करून घ्यावं.

### श्रमिकांची मुलंही रमली मूर्ती तयार करण्यात

**सोलापूर :** लोकमत आयोजित शाडूच्या गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेत पूर्व भागातील श्रमिकांच्या मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विडी-यंत्रमाग कामगारांच्या मुलांनी त्यांच्या हस्तकलेचा उत्तम नमुना या कार्यशाळेत सादर केला. अत्यंत सुंदर व आकर्षक अशा गणेश मूर्ती बनवून त्यांनी 'लोकमत'च्या व्यासपीठावर सादर केले. शुभम बंदलगी, कृष्णवेणी गजेली, कस्तुरी सपार, गायत्री श्रीराम, धनश्री कोल्हापुरे, सौंदर्या श्रीराम, रोशनी श्रीराम या विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला. शाळेतील शिक्षक शिवानंद हिरेमठ, कालिदास चवडेकर यांनी या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी भारत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष हारुण पठाण तसेच सचिव आसिफ पठाण उपस्थित होते.

Hello Solapur

---

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी शाडू मातीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना

• मंद्रपच्या विद्यार्थ्यांचा संकल्प • मंद्रप येथे इको फ्रेन्डली मूर्ती करण्याची कार्यशाळा

सोलापूर, दि. २१ ऑगस्ट - पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या 'श्रीं'ची प्रतिष्ठापना न करता स्वनिर्मित शाडू मातीच्या गणेशमूर्ती साकारून गणेशोत्सव साजरा करण्याचा संकल्प मंद्रपच्या विद्यार्थ्यांनी केला. मंद्रप (ता. दक्षिण सोलापूर) येथे दानवेश मित्र मंडळ व धर्मवीर संभाजी गणेशोत्सव तरुण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा गांधी मळ्यामध्ये घेण्यात आली. त्यामध्ये १५० पेक्षा जास्त विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

इको फ्रेन्डली गणेशमूर्तिकार प्रा. विकास गोसावी यांनी विद्यार्थ्यांना शाडूमातीपासून गणेश मूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. तसेच, मूर्ती साकारताना गणेश कथा सांगत मूर्तीच्या वैशिष्ट्यांविषयी अभ्यासपूर्ण माहिती दिली. त्यानंतर मूर्तीचे पूजन जिल्हा परिषदेच्या कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती अप्पाराव कोरे यांच्या हस्ते करून कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यावेळी रमेश नकते, राजेंद्र उंबरे, प्रा. गिरीश कुलकर्णी, पप्पू जमादार, शिवानंद हिरेमठ, एलिजाबेथ शेळके, नाना गव्हाण, अमोल मिस्कीन, मुकुंद शेटे, संजय मोहिटे आदी उपस्थित होते.

प्रारंभी गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मान्यवरांचे स्वागत केले. रवी बाडकर यांनी प्रास्तविकात मंडळाच्या सार्वजनिक उपक्रमांची माहिती दिली. विनोद कामतकर यांनी आभार मानले. कार्यशाळेसाठी अजय साठे, नीलेश निर्मळे, कुमार जोशी, रवी राठोड, राजकुमार नकते, सोमलिंग शिवाडे, शिवानंद म्हेत्रे, प्रसाद शेळके, गिरीश उंबरजे, अभिषेक कोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.





### विद्यार्थ्यांनी साकारली श्रींची मूर्ती

१ कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थी - विद्यार्थिनींनी स्वतः गणेश मूर्ती तयार केल्या. दगडूशेठ, लालबागचा राजा, नाना मंदिर आदी विविध प्रकारातील गणेशमूर्ती करण्यात विद्यार्थी दंग झाले. महात्मा फुले विद्यालय, लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाने कार्यशाळेसाठी विशेष प्रोत्साहन दिले.

२ आम्ही मैत्रिणींनी पहिल्यांदाच स्वतः मातीपासून गणेशमूर्ती तयार केली असून त्याचा खूप आनंद आम्हाला आहे. गणपतीची सोंड, मोदक अन् उंदिर करण्याचा खूप छान अनुभव आम्ही घेतला. यंदाच्यावर्षी त्याच मूर्तीचे पूजन आम्ही करणार आहोत.

- प्राची शेळके, समृद्धी मेहगुदले (विद्यार्थिनी)

### पाणी-स्वच्छता जागृती

३ पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या निमित्ताने जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र अहिरे यांनी विद्यार्थ्यांना सार्वजनिक जलसाठे प्रदूषणमुक्त करण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच, घरोघरी स्वच्छतागृह बांधण्याबाबत जागृती केली.

### वन्यजीव-पर्यावरण संवर्धन माहितीपट

४ कार्यशाळेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना अभिषेक देशपांडे यांनी तयार केलेला 'इको फ्रेन्डली गणेश' माहितीपट दाखविण्यात आला. तसेच, नेचर कन्झर्व्हेशन सर्कलतर्फे 'माळरानावरील वनवैभव' चित्रफित दाखविण्यात आली. संजय मोहिटे, शिवानंद हिरेमठ, पप्पू जमादार, रणजित शेळके, अमोल मिस्कीन व मुकुंद शेटे यांनी विद्यार्थ्यांना वन्यजीव संवर्धनाबाबत प्रबोधन केले.

५ कार्यशाळेच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे महत्त्व समजले. प्रदूषण न करण्याचा संकल्प आम्ही केलाय. आमच्या परिसरात आम्ही स्वतः तयार केलेली श्रींच्या प्रतिष्ठापना करणार.

- गणेश रुपाडे, विद्यार्थी

# इको गणेशयुग
## विकास गोसावी यांचे
वर्ष १३वे

# 'तनिष्कां'नी साकारला विघ्नहर्ता
## इको फ्रेंडली कार्यशाळा; 'सकाळ-तनिष्का' व सामाजिक वनीकरणचा उपक्रम

सकाळ वृत्तसेवा


सोलापूर : इको फ्रेंडली गणेशमूर्ती बनविण्याच्या स्मृती उद्यानातील कार्यशाळेत शुक्रवारी सहभागी झालेल्या तनिष्का सदस्या.

माती आणि कागदापासून अगदी सहज पद्धतीने गणेशमूर्ती साकारता येते. गणेशमूर्ती साकारताना तनिष्का सदस्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता.
- विकास गोसावी, कलाशिक्षक

# गणेशयुग परिवारातर्फे गणेशमूर्तींचे प्रदर्शन



संचार प्रतिनिधी

सोलापूर, दि. ५ - भारतीय अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालून गणपती यांची रचना करण्यात आली आहे. तेव्हा आपल्या संस्कृतीत या सणावारांचे खूप महत्त्व आहे, असे प्रतिपादन शिवचरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे यांनी केले.

गणेशयुग परिवाराच्यावतीने निर्मलकुमार फडकुले सभागृहाच्या तळमजल्यात १० सप्टेंबरपर्यंत भरणाऱ्या पर्यावरणपूरक गणेशमूर्तीचे प्रदर्शन आणि श्री गणेश कॅलेंडरचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी डॉ. शेटे बोलत होते.

प्रास्ताविकामध्ये गणेशयुगचे विकास गोसावी यांनी, सध्या पीओपी गणपतीमुळे खूप मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे, त्यामुळे आता आपण सगळे पर्यावरणपूरक शाडूच्या गणेशमूर्तीची स्थापना करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

गेल्या दहा वर्षांपासून गणेशयुग परिवाराच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार केले जात आहेत. कार्यशाळेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले आहे. डॉ. शेटे यांच्या हस्ते पर्यावरणपूरक गणेशमूर्तींच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. हे प्रदर्शन १० सप्टेंबरपर्यंत निर्मलकुमार फडकुले सभागृहाच्या तळमजल्यात असणार आहे. सर्व गणेशभक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन गणेशयुगचे विकास गोसावी यांनी केले आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक दुधी आणि अनुराधा पत्तार यांनी केले तर आभार आसावरी गांधी यांनी मानले.

# बाप्पा मोरया... इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा करूया!
## स्मार्ट सोलापूरकरांना 'सकाळ'चे आवाहन : प्लास्टिक अन् थर्माकोलही नको, स्मार्ट सिटीच्या चळवळीला आपणही देऊ शकतो गती



## पाच वर्षांत ३० कार्यशाळा : विकास गोसावी नावाच्या अवलियाची धडपड
# दहा हजार रसिकांना इको गणपतीचे धडे



### कॉर्न फ्लॉवरपासूनही साकारला 'श्री'




### मखरदेखील इको फ्रेंडली

# इको फ्रेंडली गणेशमूर्तींचे उद्या तनिष्कांतर्फे प्रशिक्षण

सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. १० : पर्यावरणाचे महत्त्व जाणून इको फ्रेंडली गणेशमूर्ती बनवण्याच्या प्रशिक्षणासाठी तनिष्का, युवतींचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. सामाजिक वनीकरण विभाग, 'सकाळ-तनिष्का', 'सकाळ यंग इन्स्पिरेशन नेटवर्क'च्या वतीने शुक्रवारी दुपारी तीन वाजता विजापूर रस्त्यावरील स्मृती उद्यानात हे प्रशिक्षण होईल, अशी माहिती तनिष्का गटप्रमुख वैशाली शहापुरे आणि उपसंचालक बी. एस. सकट यांनी दिली.

ख्यातनाम मूर्तिकार विकास गोसावी हे प्रशिक्षण देणार असून ते मोफत आहे. ज्यांना त्यात सहभागी व्हायचे आहे, त्या महिला व युवतींनी आपली नावे ९८५००६४०६६, ९९३००१६४२४ आणि ९८८१९४१३०९ या क्रमांकांवर नोंदवावीत. या प्रशिक्षणासाठी सामाजिक वनीकरणचे अधिकारी श्री. उबाळे, श्री. लंगोटे, एस. बी. मठपती, संजय भोईटे परिश्रम घेत आहेत.

### गोसावी यांचे मार्गदर्शन

विकास गोसावी

अक्कलकोट येथील शिवपुरी प्रशालेत चित्रकला शिक्षक म्हणून कार्यरत असलेले विकास गोसावी प्रशिक्षण देतील. इको फ्रेंडली गणेशमूर्ती बनवण्याची प्रक्रिया त्यांनी स्वतः विकसित केली असून, सोलापुरात अशा पद्धतीचे पहिले प्रशिक्षण त्यांनीच दिले होते. चित्रकलेबरोबरच फुलांची रांगोळी, शिल्पकलाही त्यांनी आत्मसात केली आहे. शालेय जीवनात भारत स्काउट अँड गाइडचा उत्कृष्ट कॅडेट म्हणून त्यांना राष्ट्रपती पुरस्कारही मिळाला होता.

लगबग गणेशोत्सवाची...

# कागदाचा 'श्री' ते पर्यावरणपूरक गणेश

## एक प्रवास कलाशिक्षक विकास गोसावींचा

### २८ रोजी कार्यशाळा

### पर्यावरणपूरक 'श्री'च...



### विसर्जन केलेली पवित्र माती 'रियूज'

### असा बनतो पर्यावरणपूरक 'श्री'

इको विकास गोसावी यांचे

# गणेशयुग

वर्ष १३वे

## गणेशयुग दिनदर्शिका प्रकाशन सोहळा...


















इको विकास गोसावी यांचे

# गणेशयुग

वर्ष १३वे





आर्टीस्ट
विकास गोसावी
98226 60121



संयोजक
आसावरी गांधी
9960105051



समन्वयक
सचिन जगताप
9822092303



समन्वयक
सोनाली वाघमोडे



निवेदिका
भूमिशा शहा




www.GANESHYUG.com
email : creativevikas@gmail.com
: Vikas Gosavi vikasgosavi
vikas_gosavi_

संतोष नगर, बाळे, सोलापूर